# महाराष्ट्र शासन
## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई — ४०० ००१.

**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३

**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल** :- director.dol@ maharashtra.gov.in


जा. क्र.-४/ग्रंथ व ई बुक्स सुटदर/२०२४-२५/२८७० दि.२५/०७/२०२४

**वाचा:**

१. शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२, दि. १७/४/२०१५.

२. ग्रंथखरेदीसाठी सुटदर निश्चित करण्याबाबतच्या दि.२३/०७/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**आदेश:-**

ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांकडून होणाऱ्या ग्रंथखरेदी व ई-बुक्सच्या सुटदरात एकरुपता रहावी म्हणून संचालनालयाकडून सुटदरपत्रके मागविणारी निविदावजा जाहिरात प्रत्येक महसूल विभागातील एका नामांकीत वृत्तपत्रांतून प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क विभागास देण्यात आली होती. तसेच सदर निविदावजा जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावरही प्रदर्शित करण्यात आली होती. विहित मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रक/ निविदाच्या आधारे सुटदर निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रंथालय संचालनालयामार्फत सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वित्तीय वर्षांकरिता सर्व शासकीय ग्रंथालयांसाठी निश्चित केलेल्या सुटदराप्रमाणे ग्रंथ व ई-बुक्स खरेदी करणे बंधनकारक राहील. निश्चित केलेल्या सुटदरापेक्षा जास्त सूट दर मिळत असल्यास त्या सूटदराने ग्रंथ व ई-बुक्सची खरेदी करण्यात यावी. परंतु निश्चित केलेल्या सुटदरापेक्षा कमी सुटदरात ग्रंथ व ई-बुक्सची खरेदी करण्यात येऊ नये.

राज्यातील ४३ शासकीय ग्रंथालये सर्व प्रकारचे मुद्रीत वाचन साहित्य सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षाकरिता खालील तक्त्यातील सूटदरानुसार कोणत्याही पुरवठादार, प्रकाशक, वितरक, विक्रेता, लेखक इत्यादीकडून ग्रंथ व ई-बुक्स खरेदी करु शकतील. सुटदरानुसार केलेल्या ग्रंथखरेदीचा अहवाल दरमहा ग्रंथालय संचालनालयास सादर करावा.

**ग्रंथ खरेदी सुटदर (२०२४-२०२५ व २०२५-२०२६)**

| अ. क्र. | विषय | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|---|
| १) | ललित | २५% | २५% | २५% |
| २) | सर्वसामाजिक शास्त्रे | २५% | २०% | २५% |
| ३) | बालवाङ:मय | २५% | २५% | २५% |
| ४) | स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ | २५% | २५% | २५% |
| ५) | सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ | २५% | २५% | २५% |
| ६) | शासकीय प्रकाशने | - | - | - |
| ७) | नवसाक्षरांसाठीचे साहित्य/ वाङ्मयेत्तर | २५% | २५% | २५% |

(कृ.मा.प.)

## ई-बुक्स खरेदी सुटदर (२०२४-२०२५ व २०२५-२०२६)

| अ. क्र. | ई-बुक्स संख्या | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|---|
| १) | **० ते १००** | १०% | १०% | १०% |
| २) | **१०१ ते ५००** | १०% | १०% | १०% |
| ३) | **५०१ ते १०००** | १५% | १५% | १५% |
| ४) | **१००१ ते २०००** | १५% | १५% | १५% |
| ५) | **२००१ ते ५०००** | २०% | २०% | २०% |
| ६) | **५००१ ते १००००** | २५% | २५% | २५% |
| ७) | **१०००० पेक्षा जास्त** | २५% | २५% | २५% |

शासकीय ग्रंथालयांनी प्रचलित खरेदी पध्दती व नियमानुसार होणा-या ग्रंथ खरेदीसाठी सदर सूटदर हे किमान (Minimum) असतील. तसेच, सदर ग्रंथ सूटदर अधिनस्त शासकीय ग्रंथालयांना स्वत:साठी व अन्य शासकीय योजनांतर्गत मान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांसाठी लागू असतील.

एखाद्या विशिष्ट ग्रंथ वा ग्रंथाच्या बाबतीत या दराने सुट मिळणे शक्य नसेल वा त्यापेक्षा कमी सुटदराने याबाबतचे विवक्षित प्रकरण संचालकांकडे सादर केल्यास त्यांच्या निर्णयानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच वेळोवेळी शासनाने व संचालनालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र. ग्रंथालय संचालक**

**प्रति,**

१) ग्रंथपाल गट-अ, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई
२) ग्रंथपाल गट-अ, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे, नागपूर
३) जिल्हा ग्रंथालय अधिकारी, शासकीय विभागीय ग्रंथालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, रत्नागिरी
४) सहाय्यक ग्रंथालय संचालक, छत्रपती संभाजीनगर /अमरावती/नाशिक/पुणे/नागपूर/मुंबई विभाग
४) जिल्हा ग्रंथालय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, दापोली, रत्नागिरी
५) जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अमरावती/ वाशिम/धाराशिव/ जालना/ छत्रपती संभाजीनगर/ नांदेड/परभणी/बीड/लातूर/हिंगोली/गडचिरोली/गोंदिया/कोल्हापूर/पुणे/सांगली/ सोलापूर/अहमदनगर/ जळगाव/धुळे/नाशिक/नंदुरबार/ठाणे/पालघर/मुंबई उपनगर/मुंबई शहर/ सातारा/ रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/चंद्रपूर/नागपूर/भंडारा/वर्धा.